२९४

(२२३)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ ऑगस्ट, २००६.

परिपत्रक

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के अन्वये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली आहे. त्या अनुच्छेदांतर्गत सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ अन्वये भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२४ व अनुच्छेद २४३ के मध्ये केवळ तीन फरक आहेत व त्यातील पहिला फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, संसदेची दोन्ही सभागृहे व राज्य विधानमंडळे यांच्या निवडणुका घेण्यात येतात तर राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका घेण्यात येतात. दुसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. तिसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राष्ट्रपती उपलब्ध करुन देतात. राज्य निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राज्याचे राज्यपाल उपलब्ध करुन देतात. हे तीन फरक सोडल्यास या दोन्ही अनुच्छेदांमध्ये काहीही फरक नाही.

२. भारत निवडणूक आयोगाने भारत सरकार व इतर शासन यांच्याविरुध्द १९९३ साली एक रिट याचिका दाखल केली होती. (रिट याचिका क्रमांक-६०६/१९९३) या याचिकेमध्ये भारत निवडणूक आयोगाला विधानसभा व लोकसभा निवडणुकीत जे अधिकारी व कर्मचारी निवडणुकीचे काम करीत असतात, त्यांच्याविरुध्द कामात निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत की नाही असा मुद्दा उपस्थित झाला होता. सुरुवातीला केंद्र शासनाने व इतर राज्य शासनाने अशी भूमिका घेतली होती की, निवडणुकीत काम करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनातील अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत केंद्र शासनाला व राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत राज्य शासनाला आहेत. केंद्र व राज्य शासन या भूमिकेविरुध्द भारत निवडणूक आयोगाने ही रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेत दिनांक-२६ जुलै, २००० रोजी भारत निवडणूक आयोग, केंद्र शासन व इतर राज्य शासन यांच्यामध्ये एक करार झाला. हा करार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद करण्यात आला आहे. या करारान्वये भारत निवडणूक

आयोगाला निवडणुकीत काम करणारे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी जे निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले असतात त्यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे अधिकार आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद केलेल्या करारात केंद्र शासन व इतर राज्यांसोबत महाराष्ट्र शासनसुध्दा पक्षकार होते व त्यांनी या कराराप्रमाणे कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ व २४३ झेडए यांच्यामध्ये निवडणुकीच्या बाबतीत फरक नसल्याने हा करार राज्य निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्या बाबतीतही लागू होतो. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे अधिकार प्राप्त आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

४. निवडणुकीचे काम प्रभाग रचनेपासून सुरु होते. निवडणुकीच्या कामात प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे, मतपत्रिका छापणे, निवडणुकीच्यावेळी मतदान यंत्र अथवा मतपेटया तयार करणे, मतदान यंत्रे अथवा मतपेटया सील करणे, निवडणुकीचे साहित्य विकत घेणे, त्यांचे वाटप करणे, मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष काम करणे, मतमोजणी करणे, निवडणुकीनंतर कागदपत्रे, मतपेटया व मतदान यंत्रे हे अधिनियमातील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाच्या अनुषंगिक आदेशानुसार व्यवस्थित ठेवणे, निवडणुकीच्या सर्व कामांची सुरक्षा ठेवणे इत्यादी कामांचा समावेश होतो. या सर्व कामात सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमलेले अधिकारी व पोलिस अधिकारी/पोलिस कर्मचारी यांनी हलगर्जीपणा दाखविल्याबाबत किंवा वरिष्ठांचे आदेश न पाळल्याबाबत परिच्छेद-३ प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
३) सर्व विभागीय आयुक्त
४) पोलिस महासंचालक, मुंबई
५) सर्व महानगरपालिका आयुक्त
६) सर्व पोलिस आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस अधिक्षक
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) सर्व गट विकास अधिकारी
११) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
१२) सर्व तहसिलदार
१३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab-action.doc

J-12431 (220)